REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# सुरेखा शहा यांच्या कथेतील स्त्रीवादी जाणिवा



**सौ. मिनाक्षी दिनेश मेडपल्ली**
**एम.ए.बी.एड. , सहशिक्षिका ,**
**स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, जुळे सोलापूर .**

## प्रस्तावना :-

कुटुंब संस्थेतील एक महत्वपूर्ण घटक म्हणजे स्त्री होय. परंतु या स्त्रीचा कुटुंब संस्थेत एक स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून कधी विचार केला जात नाही. तिच्या भोवती असलेली सर्व नाती अपेक्षांचे ओझेच तिच्यावर लादत असतात. तिला काय हवे -नको ते विचार केला जात नाही. पारंपारिकतेविरूद्ध पाऊल उचलणे म्हणजे बंड समजले जाते. स्त्रीने केवळ सहनशीलता धारण केली पाहिजे. हीच अपेक्षा सर्वांची असते. तिच्या भावभावनांचा विचार फक्त एक स्त्रीच करू शकते. म्हणून तिच्या जाणिवा स्त्री कथांमधून व्यक्त होताना दिसते. आधुनिक काळात निर्माण झालेली स्त्री आंदोलने , चळवळी यातून स्त्री आता पारंपारिकतेविरूध्द बंड करून स्वत:ला शोधू पाहात आहे. स्त्रीमुक्ती चळवळीचा तिच्या मागील स्त्रीवादी जाणीवांचा संस्कार , स्त्रियांच्या एकूणच सृजनशीलता साहित्यातून प्रतीत होवू लागला आहे. कथासाहित्य ही त्याला अपवाद नाही. अशाच स्त्रीच्या मनोव्यथांचा सुरेखा शहा यांनी 'रंग फसवा स्वप्नांचा' या कथासंग्रहात मांडलेल्या स्त्रीवादी जाणिवांचा विचार करता येईल.

## परिचय :-

सुरेखा शहा गेली चाळीस वर्षे सातत्याने कथा, कादंबरी, नभोनाट्य, कविता, एकांकिका, नाटक, प्रवासवर्णन, अनुवाद, ललितलेख, बालकुमार साहित्य, पथनाट्य या विविध विषयावर लेखन करीत आहे. त्यांच्या जोहड या चरित्रात्मक कादंबरीस अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अशा अष्टपैलू प्रतिभा संपन्न लेखिकेने स्त्री जाणिवांचा विचार करून सोळा कथांचा संग्रह प्रकाशित केला आहे. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा वाचताना आपलेच प्रतिंबिब असल्याची जाणिव होते. म्हणूनच या कथासंग्रहातील स्त्रीवादी जाणिवांचा शोध घ्यावा असेच वाटते.

प्रत्येक कथेतून स्त्रीच्या सूक्ष्म भावनांचे अवलोकन लेखिकेनी केले आहे सुरेखा शहा यांच्या कथेतील सर्वच स्त्रिया कौटुंबिक जबाबदारीची जाणीव असलेल्या आहेत त्याचबरोबर सुशिक्षित सुसंस्कारीत आहेत. स्त्रीच्या बाह्य सौंदर्याबरोबरच मानसिक किंवा आंतरिक सौंदर्य खुलेनं महत्वाचं आहे. तरच संसार, प्रपंच व्यवस्थित चालतो. याची जाणीव या कथांमधून प्रामुख्याने दिसून येते.

## १. आत्मभान :

रंग फसवा स्वप्नांच्या ह्या कथासंग्रहातील पहिल्याच कथेतून स्त्रीचे आत्मभान जागृत असल्याची जाणीव होते. कथा संग्रहातील पहिलीच कथा स्त्रीचे कुटुंबातील महत्त्व विशद करते. 'संसाराची मालकीण की मोलकरीण' या कथेत नेहा मैत्रीणीबरोबर गप्पा मारताना वर्तमानपत्रात आलेली बातमी घरकामाचा मोबदला मिळावा यासाठी संघर्ष संघर्ष करणाऱ्या स्त्रिया, याविषयी मैत्रिणीमध्ये चर्चा होते. नेहाच्या डोक्यात हा विचार पक्का होतो की, आपण घर कामाचा मोबदला घ्यायचा, याविषयी ती सुशांतशी बोलते, नेहाच्या हट्टासाठी तो ही मोबदला द्यायला तयार होतो. पण एक गोष्ट हिशोबात राहून गेलीय, परस्पर सहवासाचे जे शारीरिक सुख आपण घेतो त्याची किंमत लिहिली का नाहीस ? असे म्हणतो. त्यावेळी नेहाच्या लक्षात येते की घरातल्या प्रत्येक कामाला बाजारी स्वरूप आले तर स्वत:चे घर, स्वत:चा संसार या गोष्टीला किंमत राहिली नसती. ही कथा कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे महत्त्व विशद करते.

स्वप्नात कोसळलेला ताज कथेतील अश्विनी ताजमहाल पाहण्यात इतकी दंग होऊन जाते की तिला स्वत:च्या अस्तित्वाचाही विसर पडतो. तिचं देहभान हरपून ताजकडे पाहण्याची धुंदी पाहून ललितांग तिच्याजवळ जातो. ती ही मोकळेपणाने त्याला जवळ करते. परंतु जेव्हा तिच्या अस्तित्वावर ललितांग हक्क गाजवू पाहतो तेव्हा मात्र तिचे आत्मभान जागृत होते. स्वत:च्या कर्तव्याची जाणीव होताच त्या मोहापासून स्वत:ला परावृत्त करते व सत्याचा वास्तवाचा स्वीकार करते. एक पत्नी म्हणून पत्नीधर्माचं पालन करते. म्हणून जागृत स्त्री कधी मोहाला बळी पडत नाही. हे या कथेत दिसून येते.



LBP PUBLICATION

जियरा मोह लिया या कथेतील रिटा ही स्वतःच्या सुखासाठी दुसऱ्याचा बळी जाता कामा नये म्हणून मल्हारचा त्याग करते. नेहा , अश्विनी , रिटा या स्त्रीयांच्या अस्तित्वाने प्रत्येक कुटुंबात स्त्री जागृतीने कुटुंबाचे संरक्षण करताना दिसून येते.

अधुरं स्वप्न या कथेत उषा आणि प्रकाश लग्नानंतर पंचवीस वर्षे झाले तरी कुठे प्रवासाला जावू शकत नाहीत. म्हणून एकदा प्रकाश दूरच्या प्रवासाची माहिती घेवून येतो. संसाराच्या जबाबदारीने त्यांच्या प्रवासाचं स्वप्नं अधुरं राहून जातं. तरी उषा दुःखी न होता प्रकाशला धीर देते. यावरून स्त्रीच्या कर्तव्यदक्षतेचे दर्शन घडून येतं.

आधुनिक काळातील स्त्री सुशिक्षित झाल्यामुळे तिचे आत्मभान जागृत आहे. तिला स्वची जाणीव आहे. स्वतःवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द बोलण्याची क्षमता तिच्यात आहे याची जाणीव काही कथांमधून व्यक्त झाली आहे. तसेच दुसऱ्यावरही अन्याय होणार नाही याची दखल घेताना दिसते. गझल कथेत एकीकडे चारूवर अन्यास होतंय असे वाटतं तर दुसरीकडे माया चारूची मावशी व तिचा नवरा यांच्यात प्रेमाचे नाते असल्याचे दिसून येते.

### २. रूढी परंपरेला नकार :

'बंद दरवाजा' या कथेत जुगलं आणि अपर्णाने आंतरजातीय प्रेमविवाह केल्यामुळे दोघांच्या घराचे दरवाजे बंद होतात. तरीही जुगलं आणि अपर्णा हार न मानता संसार थाटतात. दोघांना एक मुलगा होतो. तेव्हा जुगलला मनापासून वाटतं की मॉनं आपल्या मुलाला नंदनला मांडीवर घेवून खेळवावं, पण त्यांच्यात एक बंद दरवाजा असतो. तो समाज व रूढी परंपरेचा . ज्यामुळे आईवडीलांनी जुगल व अपर्णा त्यांच्या मुलाचा स्वीकार करत नाहीत.

### ३. अन्यायाचा प्रतिकार :

वैदिक काळापासून समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. परंतु मध्ययुगात जर पाहिले तर स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात होते. त्यामुळेच १९व्या शतकात स्त्रीमुक्ती चळवळींनी जोर धरला. स्त्रियांवर होणारे अत्याचार वाढले. म्हणून सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. स्त्री शिकल्यामुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करू लागली. याचे परिणाम आधुनिक काळातही दिसू लागले. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव लेखिकेनी आपल्या कथेतून मांडली आहे.

काळवंडलेला चंद्र या कथेत सविता व आनंदचे लग्न होते. दोघं अतिशय आनंदात असतात. एक क्षणही आनंद सविताला सोडून राहत नाही. त्यांच्या प्रेमात सविताच्या पूर्वायुष्यातील पत्रामुळे अंतर पडते. आनंद , सविता दुरावतात. आनंद सवितावर अन्यायच करतो. त्याविरूध्द ती त्याला जाब विचारते. परंतु सवितावरच्या संशयामुळे आनंद तिला कायमचे दुरावतो.

### ४. स्त्री-पुरूष समानता :

स्त्री-पुरूष ही दोन्ही संसाररथाची दोन चाके आहेत. यापैकी एक चाकं जरी रूतून बसला तर संसाराचे रथ व्यवस्थित चालू शकत नाही. स्त्री-पुरूष समानता या मूल्याचा विचार ही सुरेखा शहा यांनी आपल्या कथेतून मांडला आहे.

"ज्याक्षणी बेभान व्हायचं, मोहवश होऊन सारं काही विसरायचं त्या आधीच तुझी आइवण होते. तुझा त्याग मी विसरू शकत नाही. मनात तशी इच्छा असूनही मी तुझ्याशी प्रतारणा करू शकलो नाही... यापुढेही मला ते जमणार नाही." (पृ.५९)

हे विचार आहेत 'साथी' या कथेतील भाऊसाहेबांचे. वयाने पन्नाशीला आलेले परंतु मनाने व विचाराने तरूण असलेले भाऊसाहेब त्यांच्या मनात आपली पत्नी शांताबाई यांच्याविषयी अतोनात प्रेम असल्याचे वरील शब्दांतून दिसून येते. कारण शांताबाई वयापेक्षा अधिक वृध्द दिसतात. भाऊसाहेब व शांताबाई दोघे कुठे बाहेर गेले तर लोक चर्चा करायचे. भाऊसाहेब किती हँडसम अन् यंग दिसतात. असे शेरे अनेकदा कानी पडायचे. त्यामुळे शांताबाईंना दुःख वाटायचे. म्हणून आपल्या पतीला दुसरीकडे सुख उपभोगण्याचा सल्ला देतात तेव्हा भाऊसाहेब या गोष्टीला स्पष्ट नकार देतात.

### ५. स्त्रियांचे महत्त्व :

भारतीय संस्कृतीत वाढलेली स्त्री ही संस्कारशील असते. त्यामुळेच कुटुंबातही तिच्या संस्काराचे प्रतिबिंब उमटते. हे चित्र 'संस्कार' या कथेतून दिसून येते. आनंदवर आईवडीलांनी चांगले संस्कार करताना तो परदेशी शिक्षणासाठी जातो. तिथे रूथ नावाच्या मुलीशी लग्न करून घेतो . तेव्हा आईवडील चिडतात. परंतु आनंद रूथला आपल्या कौटुंबिक संस्काराविषयी सगळं सांगतो. त्यामुळे रूथ परदेशी असूनही भारतीय संस्कृती आत्मसात करते. त्यामुळे रूथ व आनंदला बाळ झाल्याचे समजताच आई व अप्पा दोघेही बाळाला भेटण्यासाठी येतात व सुखावतात.

या कथासंग्रहातील , अनेक कथा स्त्रीयांच्या जाणिवा प्रगल्भ करते. संस्कार, अधुरं स्वप्न साथी, स्वप्नात कोसळलेला त्पज या कथांमधून स्त्री पुरूष नाते संबंधातील एकमेकांविषयीचा विश्वास, प्रेम, जबाबदारीची जाणीव करून देते. तर माया माहेराची या कथेतून स्त्री

सासरी कितीही सुखात असली तरी माहेराविषयी प्रेम, काळजी या गोष्टी तेवढ्याच तीव्रतेने तिला जाणवतात. माहेरासाठी त्याग करते. म्हणून म्हणतात मुलगा झाला तर एका घराचं उध्दार करतो, पण मुलगी झाली तर सासरं माहेर दोन्ही घराचं नाव लौकिक करते. अशा अनेक भावनांचा उलगडा लेखिकेने उत्तमपणे केले आहे.

नवेली , काळवंडलेला चंद्र, गझल , बंद दरवाजा जावे जिच्या वंशा या कथांमधून स्त्रींच्या मानसिक संघर्षाचे चित्र दिसून येते.

गझल या कथेत चारू ची स्थिती झिजावे चंदनापरी अशी झाली होती . चंदन स्वतः झिजतो त्याचा सुवास इतरांना देतो. चंदन मौल्यवान असतो. विकत घेताना विचारपूर्वक घेतले जाते. चंदनाची उपमा चारूला का द्याची म्हटलं तरी ते अशक्यचं कारण तिच्याकडे अनेक कलागुण असूनही नवऱ्याकडून कधीच कौतुक होत नाही. ऑफिस मधल्या मित्रांबरोबर ट्रीफला जाणार आहे ही गोष्ट देखील अरूण चारूला सांगत नाही. ही गोष्ट तिला उज्ज्वला कडून कळते की, सगळे मित्र जोडी-जोडीने ट्रीफला जाणार आहेत. अरूणने मात्र चारूला ट्रीफला यायला जमणार नाही असे मित्रानां सांगितला होता. तेव्हा तिच्या पाया खालची जमीन सरकते. म्हणजे नवऱ्यांच्या दृष्टीने बायको नगण्यच, कोणतीही गोष्टी तिला सांगणं तिला विश्वासात घेणं तिच्यावर प्रेम करणं. कौतुक करणं कमीपणाचं नवाटतं. बायकोने मात्र कोणतीही तक्रार न करता घर आपलं, नवरा आपला, संसाराची जबाबदारी आपलीच म्हणून कितीही त्रास झाला तरी निमूटपणे सहन करायचं हसत-खेळत सर्व सहन करायचे हे सर्व तिला जन्मजातचं मिळालेलं .

यावरून शांता शेळके यांची खांब कवितेची आठवण होते.

बाईच्या ओठांआड दडलेले असते रडणे
वर वर हसणे आणि आतल्या आत कुढणे ।
भुईत पाय रूजवून बाई आभाळवर फुलते।
देहाचाच खांब करून अवघे घर तोलते ।

वरील कवितेच्या ओळीतून कवयित्री शांता शेळके यांनी स्त्रीच्या शारिरीक व मानसिक सामर्थ्यांचा गौरव करीत तिचे घरातील अन्ययसाधारण स्थान स्पष्ट केले आहे. सुरेखा शहा यांनी देखील शांता शेळके यांच्या प्रमाणेच स्त्रींयाच्या मानसिकतेचा विचार आपल्या कथांमधून केला आहे. तिला कितीही त्रास झाला तरीही कर्तव्य व जबाबदारी या गोष्टी कधीच टाळत नाही. हेच या कथासंग्रहातून दिसून येते.

या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे या कथांमधून लेखिकेने वेगवेगळे विषय हाताळले आहेत. जसे प्रेमविवाह , आंतरजातीय विवाह, कौटुंबिक ताणतणाव, पती-पत्नी मधील ताण-तणाव, पती -पत्नीमधील विश्वास, नातेसंबंध असे अनेक कथांतून स्त्रीभावना व्यक्त केल्या आहेत. अतिशय सुरेखरित्या कथासंग्रहातील कथा गुंफल्या आहेत.

**निष्कर्ष :**

१. स्त्रीचे आत्मभान जागृत करणाऱ्या कथा आहेत.
२. स्त्री-पुरूष नात्यांतील विश्वास दृढ करणे.
३. स्त्रीचे कौटुंबिक , सामाजिक, आर्थिक महत्त्व सिध्द करणे.
४. रंग फसवा स्वप्नांचा वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१.अक्षर वैदर्भी अंक एप्रिल -२०१३ संपा डॉ. सुभाष सावरकर
२.जोहड-सुरेखा शहा
३.मराठी युवकभारती -म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ पुणे.
४. रंग फसवा स्वप्नांचा -सुरेखा शहा प्रथम आवृत्ती -२०१६